# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
## नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा व्दारा संचालित,
# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

---

### दत्तकग्राम पाथ्रटदेवी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर २०२२ संपन्न

### दिनांक ०३ मार्च ते १० मार्च २०२२

---

कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दत्तक पाथ्रटदेवी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.दिनांक 3 मार्च ते 10 मार्च 2022 या कालावधीत आयोजित वेलेल्या या शिबिराची सांगता रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.रत्नदीप गंगाळे यांच्या उपस्थित झाली.यावेळी मंचावर माजी जिल्हा समन्वयक डॉ.दीपक कुटे, गावाचे सरपंच, जयसिंगभाऊ राठोड,जगदंबा संस्थांचे अध्यक्ष श्री.राम पवार, सचिव, श्री.उत्तम चव्हाण, उपसरपंच दुर्गाताई गुडधे, प्राचार्य, अविनाश जिड्डेवार, श्री सुभाष जाधव उपस्थित होती.

यासात दिवसीय शिबिरामध्ये श्रमदानाच्या माध्यमातून सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी नालीचे खिडकाम करण्यात आले.त्यासोबत ग्रामसफाई, नाल्या सफाई, सर्वात महत्वाचा भाग म्हणजे गावाच्या दृष्टीने उपयोगी वसे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.यावेळी यवतमाळ मधील नामांकित डॉक्टरची टीम बोलाविण्यात आली होती. सर्व शिबीराकरिता महाविद्यालयाचे आणि समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.विलास माहुरकर सर यांनी पुन्हा आम्ही पाथ्रड देवी गावा करिता नेहमी सोबत राहू हे नाते आजचे नही तर जनमाेजनमी चे आहे.असे प्रतिपादन केले,तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत पाथ्रड देवी जयसिंग राठोड (सरपंच),जगदंबा संस्थाचे अध्यक्ष राम पवार,ग्रा.प. पाथ्रड देवी नरेंद्र गायकवाड ग्रामसेवक ,वैभव सुर्यवंशी तलाठी,तंटामुक्ती अध्यक्ष रमेश राठोड,यांनी आपले मनोगत सांगताना समाज आणि कार्यक्रम दोन वेगळ्या बाजू आहे,लोकांना झालेल्या कार्य हे नियमित टिकवून ठेवावी असे सांगण्यात आले,तर जगदंबा माता संस्थेचे अध्यक्ष राम पवार यांनी गाव आणि समाज सर्वांनी सोबत राहून कार्य करावे व पुढील वर्षी गावाच्या विकासाकरिता पुन्हा कॅम्प पाथ्रड देवी येथे घेण्यात यावा,असे सांगण्यात आले.उच्च प्राथमिक जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पारवेकर सर यांनी उपस्थित होते तसेच पाथ्रड देवी येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामामध्येसर्व गावकऱ्यांनी व कला व वाणिज्य महाविद्यालय बोरीअरब यांनी केलेल्या कामाच्या संदर्भात सर्व स्तरावरून तालुक्यातील नाही तर जिल्ह्यातून वा-वा होत आहे, यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रा.भाकरे सर,व सुजाता नाईक मॅडम, यांनी मोलाचे सहकार्य करून राष्ट्रीय सेवा योजना या कार्यक्रमाचे महत्व समजावून सांगण्यात आलेले आहे.व कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु प्रतीक्षा यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.प्रकाश तेलगोटे, आभार प्रदर्शन प्रा.डॉ भाकरेसर यांनी केले.